अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.पी.हनवते (वर्तमान), श्री.एस.आर.वाघ (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.डी.व्ही.बांगर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२३ | माझे वडील नामे अबुबकर बिन अहमद बाजमान, रा.पिरबावडा हे दि.११.०१.२०२३ रोजी मयत झाले असुन त्यांच्या मृत्युची रितसर नोंद आपल्या कार्यालयात केलेली आहे, माझ्या वडिलांचे नोंदणीकृत मृत्यू प्रमाणपत्राची प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्यामुळे आज रोजी

आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10202 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १५४३ ते १५४७, १५५१ व १५८० ते १५८५/२०२४ (१२)

श्री.संदिप संपतराव बनसोडे,
रा.१०८/२, ११ वी योजना, शिवाजीनगर, सिडको,
छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, रसुलपुरा,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०२.२०२४ (०६) व दि.२८.०२.२०२४ (०६) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये बारा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती.के.एस.गवारे (वर्तमान), श्री.एम.एन.गायकवाड (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.दिपक लक्ष्मण बागुल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या बारा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय | जमाअ प्रतिसाद दिनांक |
|---|---|---|---|
| ०६ | ११.१२.२०२३ | ग्रामपंचायत कार्यालयासाठी नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची माहिती, सदर कर्मचारी शासकी / निमशासकीय याबाबतची माहिती व त्यांच्या नियुक्ती आदेशाच्या सत्यप्रती, | ०१.०१.२०२४ |
| ०७ | ११.१२.२०२३ | सन २०१२ ते २०२३ या कालावधीत वर्षनिहाय मंजुर करण्यात आलेल्या कामाची व त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीची सविस्त माहिती, निधीच्या मंजुरी पत्रकाच्या सत्यप्रती, | ०१.०१.२०२४ |
| ०८ | ११.१२.२०२३ | प्रत्येक वर्षामध्ये मंजूर झालेल्या घरकुलाची यादी व मंजूर रक्कम व मंजुरी पत्राची सत्यप्रत, | ०१.०१.२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | ११.१२.२०२३ | ग्रामपंचायत कार्यालयाच्या वर्षनिहाय ऑडिट रिपोर्टच्या सत्यप्रती, सन २०१२ ते २०२३ | ०१.०१.२०२४ |
| १० | ११.१२.२०२३ | वार्ड क्र.२ मधील सर्व लोकांच्या सन २०१२ मधील नमुना नं.८ च्या सत्यप्रती, | ०१.०१.२०२४ |
| १२ | ११.१२.२०२३ | सन २०१२ ते २०२३ या कालावधीत वर्षनिहाय मंजूर करण्यात आलेल्या कामाची व त्यासाठी मंजुर करण्यात आलेल्या निधीची व निधीच्या मंजुरी पत्रकाच्या सत्यप्रती, | १२.०१.२०२४ |
| १३ | ११.१२.२०२३ | प्रत्येक वर्षी घेण्यात आलेल्या ग्रामसभा व ग्रामसभेत मांडण्यात आलेल्या ठरावाबाबतची सविस्तर वर्षनिहाय माहिती व ठरावाच्या सत्यप्रती, | ०१.०१.२०२४ |
| १४ | ११.१२.२०२३ | विकासासाठी गावात करण्यात आलेल्या कामाची सविस्तर वर्षनिहाय माहिती, | ०१.०१.२०२४ |
| १५ | ११.१२.२०२३ | गावातील जनगणनेबाबतची सविस्तर माहिती यादीसह देण्यात यावी, | ०१.०१.२०२४ |
| १६ | ११.१२.२०२३ | मागासवर्गीयांना देण्यात आलेल्या योजना, त्यासाठी प्रत्येक वर्षी वाटप करण्यात आलेला निधी व बिलांच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, | ०१.०१.२०२४ |
| १७ | ११.१२.२०२३ | अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (दलित वस्ती) या योजनेतंर्गत सन २०१२ ते २०२३ या कालावधीत पंचायत समिती खुलताबाद यांच्याकडे सादर केलेल्या पूर्ण कामांच्या प्रस्तावांच्या सत्यप्रती, | १२.०१.२०२४ |
| १८ | ११.१२.२०२३ | प्रत्येक वर्षी मंजूर निधी व त्यातुन करण्यात आलेल्या विकास कामाबाबतची वर्षनिहाय माहिती आणि निधी मंजुर पत्राच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, | ०९.०१.२०२४ |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर अपिलार्थी यांच्या गैरहजेरीत सुनावणी घेऊन सर्व प्रथम अपिले निकाली काढलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे शुल्काचा भरणा करण्याकरिता तसेच अवलोकन करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिलो असता ग्रामसेवक यांची भेट झाली नसल्यामुळे शुल्क भरता आलेले नाही व माहितीचे अवलोकन करता आलेले नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या सर्व माहिती अर्जामध्ये त्यांना व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करुन नोंदणीकृत टपालाव्दारे सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.०६, ०९, १० मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने, अपिलार्थीस शुल्क भरणेबाबत सुचित केले मात्र त्यांनी शुल्क अदा केलेले नाही / बोर्ड क्र.०७, १२, १३, १४, १६, १७ व १८ मधील माहिती अर्जातील माहिती विस्तृत असल्यामुळे अवलोकन करणेबाबत सुचित केले मात्र अवलोकनास्तव अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत / बोर्ड क्र.०८ व १५ मधील माहिती अर्जात नमूद माहिती ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या ज्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत सुचित केले व त्याप्रमाणे ते अवलोकनास्तव ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहिले नसल्यामुळे तसा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे.

वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी माहितीचे अर्ज कार्यालयाकडे सादर केले त्यावेळी कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने मुदतीत प्रतिसाद दिलेला असुन त्यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी अद्याप कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कार्यवाही केल्यास त्यांना सशुल्क माहिती देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या सर्व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन प्रथम अपिले निकाली काढण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल. जन माहिती अधिकारी यांनी ज्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने शुल्क भरणेबाबत अपिलार्थीस सुचित केलेले आहे त्या प्रकरणात शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. तसेच ज्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस सुचित केलेले आहे त्या प्रकरणात अवलोकनास्तव पुन:श्च एक संधी देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांची भेट झाली नसल्यामुळे त्यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करता आली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये त्यांना व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. मात्र असे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास कोणताही तथ्यांश दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रसुलपुरा, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, सशुल्क उपलब्ध करुन देण्यात द्यावी. अपिलार्थीस कळविलेल्या दिनांकास अपिलार्थी अवलोकनास्तव उपस्थित न राहिल्यास त्यांना माहितीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहित धरुन अपिलार्थी यांचे वर नमूद सर्व माहितीचे निकाली काढण्यात यावेत.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह १२ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि२११६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10203 दिनांक :- 22.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५५०/२०२४
बोर्ड क्र.११

श्री.संदिप संपतराव बनसोडे,
रा.१०८/२, ११ वी योजना, शिवाजीनगर, सिडको,
छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
सहायक वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन,
छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.निखील माणिकराव देशमुख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्रीमती आशा अे.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.१२.२०२३ | मौजे रसुलपुरा, ता.खुलताबाद या गावासाठी पाणी पुरवठा करण्याच्या निमित्ताने शंकरपूरवाडी येथुन रसुलपुरा गावासाठी पाईपलाईन घेण्यासाठी खोटी कागदपत्रे दाखल करुन वनविभागाच्या मालकीच्या जमिनीतुन पाईपलाईन टाकुन पाणी नेण्याकरिता वनविभागाकडुन प्राप्त केलेली परवानगी व त्या संचिकेतील सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व मागणी केलेली माहिती जनहिताशी संबंधित असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. सहायक वनसंरक्षक (वनीकरण), छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10204 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९०१७/२०२४**
**बोर्ड क्र.१९**

श्री.संदीप संपतराव बनसोडे,
रा.१०८/२, ११ वी योजना, शिवाजीनगर, सिडको,
छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कक्ष प्रमुख (मग्रारोहयो),
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो), श्री.शिवाजी आसाराम मते व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.पि.व्ही.नाईक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२४ | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दि.०१.०३.२०२४ ते दि.३०.०४.२०२४ या कालावधीत खुलताबाद तालुक्यातील लाभार्थ्यांना सिंचन विहिरीसाठी देण्यात आलेल्या मंजुरीपत्रांच्या सही व शिक्कासहीत सत्यप्रती देण्यात याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३१.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली २४ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे चार दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली नाही, अपूर्ण माहिती पाठविण्यात आली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीदरम्यान युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10205 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -२१८७ व २१८८/२०२४ (०२)

श्री.जलील पिरखा पठाण, — अपिलार्थी
रा.रसुलपुरा, पो.गोळेगाव, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, रसुलपुरा,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती के.एस.गवारे (वर्तमान), श्री.एम.एन.गायकवाड (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.दिपक लक्ष्मण बागुल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २० | २८.०८.२०२३ | मौजे रसुलपुरा येथील गट क्र.४६ मध्ये खदानीसाठी एनओसी कशा आधारे देण्यात आली, ग्रामसभा व मासिक मिटींगव्दारे यामध्ये किती लोक उपस्थित होते, त्यांच्या आधार कार्डसहित उपस्थित असलेल्याची नावे देण्यात यावी, ०१ जानेवारी २०१७ ते ऑगस्ट २०२३, |
| २१ | ३१.०८.२०२३ | १. ग्रामपंचायतीने ०१ जानेवारी २०१२ ते ३१ ऑगस्ट २०२३ दरम्यान कोणकोणती विकास कामे केली, विकास कामाची यादी द्यावी, या विकास कामासाठी केंद्र सरकार, राज्य सरकारच्या कोणत्या योजनेतुन किती निधी मिळाला, सदरील निधी कधी व कसा खर्च करण्यात आला,<br>२. आपल्या ग्रामपंचायतीच्या मागील तीन वर्षाच्या ऑडिट रिपोर्टची छायांकित प्रत द्यावी, |

| | | |
|---|---|---|
| | | ३. ग्रामपंचायतीमध्ये एकुण किती कर्मचारी आहेत, त्यांना किती रुपये मासिक वेतन दिले जाते याचा तपशिल द्यावा,<br>४. ग्रामपंचायतीला ०१ जानेवारी २०१२ ते ३१ ऑगस्ट कोणकोणत्या उद्देशासाठी शासनाकडुन किती रुपये थेट अनुदान किंवा मदत रक्कम मिळाली, या रकमेचा विनियोग कोठे केव्हा व कसा झाला,<br>५. ०१ जानेवारी २०१२ पासुन ३१ ऑगस्ट २०२३ ग्रामपंचायतीच्या एकुण किती ग्रामसभा भरवल्या गेल्या, प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित पुरुष व महिला सदस्यांची नावे व पत्ते मिळावेत, ग्रामसभेत मंजुर झालेल्या सर्व ठरावाची छायांकित प्रती मिळाव्या, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अवलोकन करणेबाबत कळविलेले आहे. मात्र माहिती अर्जानुसार माहिती मागितली असुन माहितीचे अवलोकन मागितलेले नाही. त्यामुळे माहितीचे अवलोकन केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क कळविणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क कळविले असते तर ते भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेतली असती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली आहे, मात्र त्यांनी निर्णय पारित करताना जन माहिती अधिकारी यांचीच बाजु विचारात घेऊन अवलोकनाबाबतचाच निर्णय पारित केलेला आहे. या प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन कार्यवाही केलेली नाही. मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व विविध विषयाची असुन याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करणेबाबत सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी तसे अवलोकन करणेबाबत अद्याप प्रतिसाद दिलेला नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात त्यांना व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची व अनेक विषयाशी संबंधित आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत प्रतिसाद देऊन, दि.२७.०९.२०२३ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन माहितीचे अवलोकन करण्याकरिता अपिलार्थीस आणखी एक संधी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन, दि.१८.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दि.२८.११.२०२३ रोजी कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी यावेळी देखील माहितीचे अवलोकन करण्याकरिता प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे दि.२८.११.२०२३ रोजी उपस्थित पंचासमक्ष अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीचा पंचनामा करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत असल्यामुळे त्यांनी अवलोकन केले असते तर त्यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देणे सोयीचे ठरले असते. कारण अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील पृष्ठांची गणना करुन विहित शुल्क अपिलार्थीस कळविण्याकरिता अतिरिक्त मनुष्यबळ वळवावे लागले असते आणि याचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावर होण्याची शक्यता नाकारता आली नसती. म्हणून अपिलार्थीस अवलोकन करणेबाबत सुचित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जास दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करण्याकरिता आणखी एक

संधी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, ३० दिवसाचा कालावधी संपवुन माहिती आजपर्यंत न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहितीचे अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात त्यांना माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे उत्तरदायित्व पार पाडले असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे माहितीचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10206 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक २३३८/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

सौ.अर्चना अरुण केदारे,
रा.प्लॉट क्र.२२, २३, सौजन्य नगर, कर्मविर शंकरसिंग नाईक शाळेजवळ, न्यू बालाजी नगर, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, गदाना,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, श्री.अरुण केदारे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.गायकवाड गंगाधर संपतराव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.दिपक लक्ष्मण बागुल उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१२.२०२३ | मौजे गदाना येथील ग्रामपंचायतच्या शासकीय जमीन तपशिल, जमीन वाटप तपशिल व इतर माहिती याबाबत दोन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१२.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध

करुन दिलेली माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्यामुळे आज रोजी आयोगासमोर विचाराधिन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10213 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ८२७७/२०२४
बोर्ड क्र.२३

श्री.विरेंद्र सिताराम वाघ,
रा.जुनी स्टेट बँकच्या मागे, खुलताबाद,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.जी.एस.पवार, प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.पि.व्हि.नाईक, विस्तार अधिकारी (पं), श्री.दिपक लक्ष्मण बागुल उपस्थित आहेत. तसेच पंचायत समिती, खुलताबाद अंतर्गत बहुतांश ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२३ | खुलताबाद तालुक्यातील सर्व / प्रत्येक ग्रामपंचायतचे जमा व खर्चाची विवरणपत्रात माहिती मिळणेबाबत, सदर माहिती पाच मुद्यांव्दारे मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज वर्ग करुन सर्व ग्रामपंचायत कार्यालयास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविलेले आहे. काही ग्रामपंचायत कार्यालयाची माहिती मिळालेली नाही. उर्वरित ग्रामपंचायत कार्यालयाची माहिती मिळाली नसल्यामुळे व या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन

देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पंचायत समिती खुलताबाद कार्यालयाच्या अधिनस्त जवळजवळ ४० ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०१.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अर्ज सर्व ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जवळजवळ ४० ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असुन सदर माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. काही ग्रामपंचायत कार्यालयाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आज रोजी सुनावणीच्या अनुषंगाने संबंधित सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना उपस्थित राहण्याचे कळविलेले असुन त्या अनुषंगाने बहुतांश ग्रामपंचायत अधिकारी आज रोजीच्या सुनावणीकरिता उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दुष्ट हेतुने दिशाभूल करण्यासाठी अपूर्ण माहितीचा आदेश दिला, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी काही ग्रामपंचायत कार्यालयाची माहिती मिळाली असल्याचे व उर्वरित ग्रामपंचायत कार्यालयाची माहिती मिळाली नसल्याचे कळविलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडे सादर केला असुन माहिती कार्यालयाच्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे माहितीचा अर्ज सर्व ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित एकाच कार्यालयाकडे वर्ग करुन उर्वरित कार्यालयाकडे स्वतंत्र अर्ज करणेबाबत अपिलार्थी यांना कळविणे आवश्यक आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचा सारासार विचार न करता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज सर्व ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती अनेक कार्यालयाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.10207 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ८३९१/२०२४
बोर्ड क्र.२४

श्री.विरेंद्र सिताराम वाघ, अपिलार्थी
रा.जुनी स्टेट बँक जवळ, खुलताबाद,
ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०६.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.जी.एस.पवार व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.पि.व्ही.नाईक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०२.२०२४ | खुलताबाद तालुक्यातील मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीरी मंजुर झालेल्या विहिरीच्या कार्यरंभ आदेशासह संपूर्ण संचिकेच्या प्रती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास

दि.१७.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली ६६ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याचा आदेश देऊनही जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांनी दृष्ट हेतुने दिशाभूल करुन माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10208 दिनांक :- 22.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६३२६/२०२४
बोर्ड क्र.२५

श्री.बाळु कडुबा साळवे,
रा.बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.संजय सी.गायकवाड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्रीमती उषा मोरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०३.२०२४ | मिळकत नं.७७ मधील झालेले सर्व फेर फार व सर्व रजिस्ट्री व सर्व ग्रामसभेचे ठराव मिळणेबाबत, सन १९९० ते आजपर्यंत, मिळकत नं.७८ चे सर्व नमुना ८ अ च्या सत्यप्रती, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि.२१.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विस्तार अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अपेक्षित आहे. त्यांनी निर्णय पारित केला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब कार्यालय प्रमुख या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा कालावधी मोठा आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10209 दिनांक : 22.08.2025

प्रत :-आवश्यक कार्यवाहीकरिता,

जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बिल्डा, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ६८२३/२०२४
बोर्ड क्र.२६

श्री.सतीश भास्कर खरे, — अपिलार्थी
यु.टी.क्र.१५०, बॅरक क्र.१५, नवीन -१६, सर्कल, मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, खामगाव,
ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.डि.व्हि.बोरार उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.११.२०२३ | आपल्या कार्यालयातील अभिलेखानुसार अर्जदाराचे आजोबा सांडु राणू खरात यांच्या मृत्यू दिनांकाच्या नोंदीसंबंधी प्रतीची व मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. सदर निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथी यांच्या माहिती अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खामगाव, ता.फुलंब्री,

जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खामगाव, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10210 दिनांक : 22.08.2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७९३९/२०२४
बोर्ड क्र.२७

श्री.सुभाष परभतराव खमाट, — अपिलार्थी
रा.उमरावती, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती,
ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प), श्री.गजेंद्र दिलीपराव देशमुख उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०२.२०२४ | वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत, दि.०८.०२.२०२४ व दि.२५.०४.२०२४ इ. अर्जावरील झेरॉक्स प्रत जोडली आहे त्यातील संपूर्ण माहिती मिळवुन देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे ०७ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती, ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10211 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८५९१/२०२४**
**बोर्ड क्र.२८**

श्री.सोमिनाथ नारायण सोनवणे,
रा.साईनगर, चित्तेगाव पैठण रोडवरचे,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.संजय सी.गायकवाड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्रीमती उषा मोरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०६.२०२४ | कैलास नारायण सोनवणे, रा.खामगाव, ता.फुलंब्री येथील रहिवासी असुन यांनी ग्रामसेवक सांगळे साहेब यांच्या कार्यकाळात बायोगॅस व्यवस्थापन अंतर्गत गोबरगॅस सयंत्र बांधकामाकरिता पुरक अनुदान म्हणून किती रुपये दिलेले आहे व गोबर गॅस मंजूर करण्यासाठी लागलेले संपूर्ण कागदपत्राच्या संचिका लेखी स्वरुपात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२७.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीपोटीच्या २८/- इतक्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केलेला नाही. मात्र अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.१२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिल्याची बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे विचाराधिन अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट, अपूर्ण, चुकीची, दिशाभूल, अवमान करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10212 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९२९/२०२४
बोर्ड क्र.२९

श्री.दिलीप नारायणराव कुलकर्णी (भालेराव), — अपिलार्थी
रा.दत्त मंदिरासमोर, खंडाळा, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा,
ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.भिमराज रंगनाथ दाणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्रीमती रंजना लालसिंग राठोड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०८.२०२३ | १. मा.दिवाणी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मला संत एकनाथ महाराज सार्वजनिक मंदीर ग्रा.पं. घर.क्र.२७९ सिटी सर्व्हे क्र.६६ च्या मिळकतीच्या मुल्यांकनानुसार कोर्ट फीस भरण्यासाठी मला सदर मिळकतीचे मुल्यांकन करण्यासाठी मिळकतीच्या न.नं.८ मधील आपल्या नोंदीनुसार मालमत्ता रकान्यात मंदीराची लांबी रुंदी, बांधकामाचे स्वरुप व उर्वरित सहन जागा याचे एकुण क्षेत्रफळ किती आहे याचा स्पष्ट उल्लेख करुन सदर माहितीची प्रमाणे नक्कल द्यावी,<br>२. ग्रा.पं.न.नं.८/२७८/२७८/१ च्या खालील पाच वर्षे म्हणजे २०११/२०१२/२०१३/२०१४ व चालु वर्ष २०२३ च्या ग्रा.पं. न.नं.८ चे असेसमेंट बुकाच्या वरील इ.सनाच्या ५ छायांकित सत्यप्रतीच्या प्रमाणित नकला मिळाव्या, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जासंदर्भात दाखल केलेले प्रथम अपील हे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीनंतर दाखल केलेले असल्याने ते फेटाळण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे माहिती / वस्तुस्थिती वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती लेखी स्वरुपात दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि २२।८

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10214 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६२५४/२०२४
बोर्ड क्र.३०

श्री.सोमिनाथ नवनाथ पवार,
रा.कनकसागज, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवूर, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, डॉ.नायला हाश्मी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, डॉ.गुरुनाथ इंदूरकर उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.१२.२०२३ | आरोग्य उपकेंद्र जानेफळ, खंडाळा अंतर्गत आरोग्य सेविका यांनी केलेल्या दैनंदिन कामाचा तपशिल मिळावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२९.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीपोटीच्या रु.६०००/- इतक्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपिलार्थी यांनी अद्याप शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर

दि.१५.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केला असल्याचे प्रथम अपील सुनावणीदरम्यान आढळुन न आल्याने अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांनी सूचित केलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी अद्याप शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसुन येत नाही. आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यावरुन अपिलार्थी यांना माहितीमध्ये व आयोगापुढील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10221 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२५५/२०२४**
**बोर्ड क्र.३१**

श्री.सोमिनाथ नवनाथ पवार, — अपिलार्थी
रा.कनकसागज, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.डी.जे.कुमावत, कनिष्ठ सहायक, उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.११.२०२३ | ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचा लाभार्थ्यांची सविस्तर माहिती मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना प्रथम अपील सुनावणीदरम्यान उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.१३.०२.२०२४ रोजी निवेदन देऊन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१३.०२.२०२४ रोजीचे निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10222 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ६९९५/२०२४**
**बोर्ड क्र.३२**

श्री.अमर गुलाबराव सोमवंशी, — अपिलार्थी
रा.लाडगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, लाडगाव,
ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आय.ई.शेख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.ए.व्ही.पवार उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०१.२०२४ | अतिरिक्त ग्रामरोजगार सेवक निवडीची ग्रामसभा किंवा मासिक सभा ठराव व इतर |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दि.०३.०५.२०२४ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन मागितलेली माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती

उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10223 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८५४०/२०२४**
**बोर्ड क्र.३३**

श्री.ज्ञानदेव हरीचंद्र वैद्य,
रा.महाले निवास, पिंगळे गल्ली, मखमलाबाद, नाशिक — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.व्ही.पवार उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०७.२०२४ | विस्तार अधिकारी पं.स.वैजापूर यांनी दि.२६.०५.२०१७ रोजी बेलगाव अतिक्रमण अहवाल तयार केला त्याची प्रमाणित प्रत मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना दि.१६.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप अहवाल मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले

असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10224 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९३८८/२०२४
बोर्ड क्र.३४

श्री.दत्तात्रय बन्सी वैद्य,
रा.लाडगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, लाडगाव,
ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार, आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.इलियास इब्राहिम शेख व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.व्ही.पवार उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०७.२०२४ | दि.११.०३.१९९७ रोजी ठराव घेऊन ठराव क्र.८८ च्या ठरावाची नक्कल व आठ अ चा उतारा व प्रविण मधुकर सोमवंशी घर क्र.६८५ आणि बाळासाहेब बाबुराव सोमवंशी घर क्र.६८६ यांचा ८ अ चा उतारा दिलेल्या जागेची ठरावाची नक्कल व बांधकामाची परवानगीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेखात हेराफेरी करुन मूळ अभिलेख गहाळ करण्यात आलेला आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे ०८ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयीन अभिलेखामध्ये शोध घेतला असता सदर माहिती आढळुन आली नसल्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा आणखी शोध घेण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन दिल्यास सदर माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची

कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये हवी असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केलेले आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आढळुन येत नाही. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. या बाबीकडे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, आयोगाचे आदेश प्राप्ती होताच तीस दिवसाच्या आत, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेल्या व विहित तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचारी यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशी माहिती जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करणेबाबतची कार्यवाही अनुसरावी. अशी कार्यवाही अनुसरताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10225 दिनांक : 22.08.2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १०५०७ ते १०५१२/२०२४ (०६)**

श्री.संजय तात्याबा उगले,
रा.दहेगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, दहेगाव,ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर. — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.११.२०२४ रोजी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.पी.एस.राजपुत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.आर.एल. राठोड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३५ | २६.०८.२०२४ | दहेगाव ग्रामपंचायत नमुना नंबर ०५ व १५ ची सत्यप्रतीत माहिती, सन २०२१ ते २०२४ पर्यंत, |
| ३६ | २६.०८.२०२४ | दहेगाव / राहेगव्हाण ग्रामपंचायतची ४ (१) (ख) ची माहिती, सन २०२३, २०२४ |
| ३७ | २६.०८.२०२४ | ग्रामपंचायत दहेगाव / राहेगव्हाण येथील ग्रामसभा मासिक सभा माहिती, सन २०२१ ते २०२४ |
| ३८ | २६.०८.२०२४ | दहेगाव ग्रामपंचायतला शासनाकडुन प्राप्त निधी व खर्च झालेला निधी व कामे याची माहिती, सन २०२१ ते २०२४, |
| ३९ | २६.०८.२०२४ | ग्रुप ग्रामपंचायत दहेगाव / राहेगव्हाण ऑडिट रिपोर्ट व ऑडिट अहवाल सत्यप्रतीत, सन २०२१ ते २०२४, |
| ४० | २६.०८.२०२४ | ग्रामपंचायत दहेगाव / राहेगव्हाण सर्व बँक खाते स्टेटमेंट पासबुक झेरॉक्स सत्यप्रतीत, सन २०२१ ते २०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध

करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कामाच्या व्यापात अद्याप उपलब्ध करुन देता आलेली नाही. सदर मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दहेगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी** आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.10215 दिनांक :22.08.2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०९९६/२०२४
बोर्ड क्र.४१

श्री.संजय तात्याबा उगले,
रा.दहेगाव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२९.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.अक्षय रमेश भगत, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.डी.जे.कुमावत, कनिष्ठ सहायक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०९.२०२४ | सन २०२१ ते आजरोजीपर्यंत, ग्रुप ग्रामपंचायत दहेगाव / राहेगव्हाण ग्रामपंचायत परिशिष्ठ चार प्रमाणे पंचायतीचा सखोल तपासणी चा नमुना (क) तपासणी अधिकाऱ्याचे नाव पदनाम तपासणी ठिकाण दिनांकासह सत्यप्रतीत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदींनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशांसह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 1026 दिनांक : 22.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०८०८/२०२४
बोर्ड क्र.४२

श्रीमती सिमा सुधीर पाटील,
रा.पिंपळगाव हरेश्वर, ता.पाचोरा, जि.जळगाव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, निंबायती,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं)
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी श्री.सुनिल हनुमंतराव राकडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०९.२०२४ | शेत गट नं.७५ मधील अतिक्रमित व बखळ जागाबाबत माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, आमची स्वत:ची शेत जमीन निंबायती गावालगत गट नं.७५ मध्ये असुन गावातील बांधीव आरसीसी घरे व सहान जागा आमच्या गटात अतिक्रमित आहेत. त्यामुळे याबाबत योग्य ठिकाणी दाद मागण्याकरिता माहितीची मागणी करण्यात आलेली आहे. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या १४ घरांपैकी केवळ चार घरांची माहिती मिळालेली आहे. उर्वरित माहिती मिळालेली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन दि.२२.०८.२०२४ व दि.३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रासोबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व

माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान उर्वरित माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10216 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६८८/२०२४
बोर्ड क्र.४३

श्री.समाधान सदा हाटकर,
रा.पिंपळगाव हरे, ता.पाचोरा, जि.जळगाव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पळसखेडा,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.एफ.पाटील व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.एन.दौंड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.१०.२०२३ | सन १९६० ते १९८० पर्यंतचे जन्म दाखला रजिस्टर निरीक्षणास मिळावे, पुरुषोत्तम सदाशिव हाटकर या व्यक्तीला दिलेल्या जन्म दाखल्याचे आपल्या कार्यालयातील मुळ अभिलेख निरीक्षणास मिळावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील विनंतीनुसार दि.२३.११.२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहुन अभिलेखाचे निरीक्षण करणेबाबत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे ते निरीक्षणाकरिता

कार्यालयात उपस्थित राहिलेले नाहीत. त्यामुळे माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करता आलेली नाही. वास्तविक अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. मात्र व्यक्तिश: माहितीची मागणी करुन ते कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित राहिलेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापपर्यंत माहिती प्राप्त नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहितीचे निरीक्षण करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. मात्र अपिलार्थी माहितीचे निरीक्षण करणेबाबत अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीकरिता देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यावरुन अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये व आयोगापुढील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10217 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७६४६/२०२४
बोर्ड क्र.४४

श्री.विजय बन्सी पगारे,
रा.सोयगाव, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक कार्यक्रम अधिकारी (मग्रारोहयो),
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०४.२०२४ | रोजगार हमी योजना अंतर्गत प.स.सोयगाव मार्फत तालुक्यातील किती लाभार्थ्यांना गाय गोठे व विहिर मंजुर झाल्या व त्यापैकी किती पूर्ण झाले पैकी अपूर्ण किती याची गावनिहाय व नावाच्या यादीसह संपूर्ण संचिकासह माहिती मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळुन माहिती संकेतस्थळावर असल्याचे कळवुन दिशाभूल केलेली आहे. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, उडवा उडवीचे उत्तर देत मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागितलेली माहिती WWW.NREGA.NIC.IN या संकेतस्थळावर जनहितार्थ प्रकाशित करण्यात आली असुन या संकेतस्थळावर ती संकलित करुन घेण्यात यावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती कागदपत्र स्वरुपात देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांना हवी असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे संबंधित संकेतस्थळावर संपर्क करुन प्राप्त करुन घ्यावी.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10218 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८३८२, ८३८३ व ८३८७/२०२४ (०३)

श्री.विजय बन्सी पगारे,
रा.सोयगाव, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, फर्दापूर,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सुनिल माणिकराव मंगरुळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.एन.दौड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४५ | १०.०४.२०२४ | नवीन बांधकाम परवाना, दुरुस्ती परवाना, अतिक्रमण विषयक आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात नवीन बांधकाम परवाना व दुरुस्ती परवाना दिलेल्या सर्व परवान्याच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात, परवान्यासाठी केलेल्या अर्जाच्या छायाप्रती देण्यात याव्यात, |
| ४६ | १०.०४.२०२४ | ग्रामसभा आयोजन ठराव व ग्रामस्थ उपस्थिती माहिती खाली दर्शविलेल्या कार्यकाळात ग्रामसभेत मंजूर ठराव व ग्रामस्थ उपस्थिती रजिस्टरच्या सर्व छायाप्रती देण्यात याव्यात व सर्व महिला ग्रामसभा मंजूर ठराव आणि महिलांची उपस्थिती रजिस्टरच्या सर्व महिला ग्रामसभा मंजूर ठराव व महिलाची उपस्थितीच्या छायाप्रती द्याव्या, सन २०१३ ते २०२४, |

| | | |
|---|---|---|
| ४९ | १०.०४.२०२४ | ग्रामपंचायत अंतर्गत मनरेगा व दक्षता समिती VMC दक्षताच्या सर्व सदस्यांची नावे व पत्ते, सदर समितीने मनरेगामध्ये झालेल्या कामाच्या ठिकाणी भेट देणे, कामाचे मुल्यमापन करणे, कामाच्या ठिकाणी असणाऱ्या सुविधांचा आढावा घेणे व कामाच्या मुल्यांकन आदी कामाचा ग्रा.प.कडे वर्क रजिस्टरमध्ये नोंद करण्यासाठी दिलेल्या रेख समितीच्या छायांकित प्रती सन २०१४ ते २०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क कळविण्याऐवजी माहितीची पाहणी करणेबाबत सुचित करुन दिशाभूल केलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन १० दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद करुन कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रथमत: दि.०८.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कार्यालयीन वेळेत उपस्थित राहुन माहिती पाहुन अधोरेखीत केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी या पत्राच्या अनुषंगाने माहितीची पाहणी करणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. या नंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे निर्देशित केल्याप्रमाणे दि.१५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, तीनही माहिती अर्जाची माहिती झेरॉक्स करुन देण्याकरिता कार्यालयात तयार असुन ती स्वत: हस्तगत करावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना कळविल्याप्रमाणे त्यांनी कार्यालयात उपस्थित राहुन माहिती हस्तगत केलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मागितली असता टाळाटाळ केली, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणेबाबत तसेच माहिती हस्तगत करणेबाबत कळविलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करणेबाबत व माहिती हस्तगत करणेबाबत प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहितीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10219 दिनांक : 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८३८४, ८३८५ व ८३८७/२०२४ (०३)

श्री.विजय बन्सी पगारे,
रा.सोयगाव, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जरंडी,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.सुनिल माणिकराव मंगरुळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ए.एन.दौंड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४७ | १०.०४.२०२४ | ग्रामपंचायत अंतर्गत मनरेगा व दक्षता समिती VMC दक्षताच्या सर्व सदस्यांची नावे व पत्ते, सदर समितीने मनरेगामध्ये झालेल्या कामाच्या ठिकाणी भेट देणे, कामाचे मुल्यमापन करणे, कामाच्या ठिकाणी असणाऱ्या सुविधांचा आढावा घेणे व कामाच्या मुल्यांकन आदी कामाचा ग्रा.प.कडे वर्क रजिस्टरमध्ये नोंद करण्यासाठी दिलेल्या रेख समितीच्या छायांकित प्रती सन २०१४ ते २०२४, |
| ४८ | १०.०४.२०२४ | नवीन बांधकाम परवाना, दुरुस्ती परवाना, अतिक्रमण विषयक आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात नवीन बांधकाम परवाना व दुरुस्ती परवाना दिलेल्या सर्व परवान्याच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात, परवान्यासाठी केलेल्या अर्जाच्या छायाप्रती देण्यात याव्यात, |

| | | |
|---|---|---|
| ५० | १०.०४.२०२४ | ग्रामसभा आयोजन ठराव व ग्रामस्थ उपस्थिती माहिती खाली दर्शविलेल्या कार्यकाळात ग्रामसभेत मंजूर ठराव व ग्रामस्थ उपस्थिती रजिस्टरच्या सर्व छायाप्रती देण्यात याव्यात व सर्व महिला ग्रामसभा मंजूर ठराव आणि महिलांची उपस्थिती रजिस्टरच्या सर्व महिला ग्रामसभा मंजूर ठराव व महिलाची उपस्थितीच्या छायाप्रती द्याव्या, सन २०१३ ते २०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क कळविण्याऐवजी माहितीची पाहणी करणेबाबत सुचित करुन दिशाभूल केलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन प्रथम अपिलावर दि.२४.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन सात दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे व एका प्रथम अपिलावर दि.०८.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद करुन कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रथमत: दि.०८.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, कार्यालयीन वेळेत उपस्थित राहुन माहिती पाहुन अधोरेखीत केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी या पत्राच्या अनुषंगाने माहितीची पाहणी करणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. या नंतर अपिलार्थी यांच्या तीनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीच्या रु.२६००/- इतक्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणेबाबत तसेच माहितीपोटीचे विहित शुल्क भरणेबाबत कळविलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करणेबाबत तसेच माहितीपोटीचे विहित शुल्क भरणेबाबत प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहितीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 10220 दिनांक : 22.08.2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८५४५/२०२४**
**बोर्ड क्र.५१**

श्री.किरण अजीनाथ सातपुते, — अपिलार्थी
रा.बोरमाळा, पो.तिडका, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, तिडका,
ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.प्रफुल भगवान गोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.अशोक एन.दौड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०७.२०२४ | ग्रामपंचायत कार्यालय तिडका येथील अभिलेखातील नमुना नं.८ चा उतारा मिळण, १. शे.मुनीर, २. शे.फईम शे.बशीर, ३.नजीशफी शे.----, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा

पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तिडका, ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आंत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10227 दिनांक: 22.08.2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४१५/२०२४**
**बोर्ड क्र.५२**

श्री.संजय बाबुराव येरपुरवाड,
रा.जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जिजामाता ट्रस्ट बिल्डींग,
चौधरी पेट्रोल पंपाजवळ, रेल्वेस्टेशन समोर, गवळीपुरा, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जिजामाता ट्रस्ट बिल्डींग,
चौधरी पेट्रोल पंपाजवळ, रेल्वेस्टेशन समोर, गवळीपुरा, नांदेड

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०९.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, श्री.संजय सु.जोशी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०४.२०२४ | मौजे जांब बु. ता.मुखेड येथील निती निकेतन शिक्षण संस्था, नोंदणी क्र. एफ.५७ नां. या संस्थेची जमीन सर्व्हे नं.१०४ गट नं.४३३ मौ.जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड या संस्थेने बेकायदेशीर फेर फार केल्या असल्याने मी दि.०१.११.२०२३ रोजी तक्रारी अर्ज दाखल केला होता, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.१३.१२.२०२३ रोजी आपल्या कार्यालयाकडे पुराव्यासह लेखी जबाब नोंदविला होता, सदर जबाबानुसार कार्यालयाकडुन केलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती

जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी कोर्टाचे आदेश होण्यासाठी प्रलंबित असल्याने चौकशी अहवाल देता येत नसल्याचे कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली अशी बाब योग्य नसल्यामुळे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात चौकशीची प्रक्रिया पूर्ण होऊन चौकशी अहवालावर कोर्टाचे आदेश प्रलंबित असल्यामुळे चौकशी अहवाल उपलब्ध करुन देता येत नसल्याचे अपिलार्थी यांना दि.०६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.२७.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीदरम्यान अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात चौकशी प्रक्रिया पूर्ण होऊन चौकशी अहवाल सक्षम प्राधिकारी यांना सादर करण्यात आलेला आहे. मात्र सदर चौकशी अहवालावर निर्णय अंतिम झालेला नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 10228 दिनांक : 22.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ८४१९, ८१०, ८११, ४५७४, ८४१६, ८१०४, ८१५, २५६९, ४५७३, ६३१३, ६३१४, ७७१०, ७७११, ७७१७, ७७१८, ८१४, २५७०, ८४१७ व ४५७२/२०२४ (१९)

श्री.संजय बाबुराव येरपुरवाड,
रा.जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | व्दितीय अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी |
|---|---|---|---|
| ५३ | ८४१९/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ६२ ते ६६ | ८१०, ८११, ४५७४, ८४१६ व ८१०४/२०२४, | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ६७ | ८१५/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ६८ | २५६९/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ६९ | ४५७३/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ७० व ७१ | ६३१३ व ६३१४/२०२४ | जन माहित अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस अधिकारी, देगलूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ७२, ७४, ७५, ७६, | ७७१०, ७७१७, | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | ७७१८, ८१४, ४५७२/२०२४ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ७३, ७७, ७८ | ७७११, २५७०, ८४१७/२०२४ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड<br><br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १९ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या १९ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५३ | ०१.०४.२०२४ | मोजे जांब बु. ता.मुखेड, जि.नांदेड येथील वि.का.सेव. सह.संस्था मर्या., जांब बु. चे चेअरमन जीवनराव रामराव गोंड, सचिव आर.एस.वाघमारे, सदस्य पंडित तुकाराम सुर्यवंशी, ज्ञानोबा तुकाराम कटाळे तसेच अनिल विठ्ठलराव कोल्हे तसेच ग्रामविकास अधिकारी निळकंठ निवृत्ती गिते यांनी संगणमत करुन खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन मा.जिल्हाधिकारी नांदेड यांच्या स्थगिती आदेश असतानाही फसवणूक करुन मालमत्ता क्र.११८५, ११८६ ही मालमत्ता बेकायदेशीर हस्तांतर करुन फसवणूक करणाऱ्या व स्थगिती आदेशाचा अवमान करणाऱ्या आरोपी विरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यासाठी मी व गावातील इतर लोकांनी दि.१७.०७.२०२३, दि.३१.०७.२०२३ व दि.१५.११.२०२३ रोजी पुराव्यासह तक्रारी अर्ज दिला होता, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल मिळणे, |
| ६२ | ०१.११.२०२३ | दि.२५.०७.२०२३ रोजीचे जा.क्र.३६१३ देण्यात आले आहे, सदरचे पत्र देण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे सदर संस्थेकडुन बदल करण्यासाठी दाखल केलेली सर्व संचिका व आपल्या कार्यालयाला कोणत्या नियमानुसार शाळेच्या नावात बदल करण्याचे अधिकार आहेत, या बाबतचा शासन निर्णय, |
| ६३ | २३.१०.२०२३ | मौ.जांब बु. येथील नि.नि. विद्यालयाचे गट क्र.४३३ मधील नाव बदलाचे आपण संस्थेला दिलेले पत्र (आदेश) मिळणेबाबत, |
| ६४ | १८.१२.२०२३ | निती निकेतन शिक्षण संस्था जांब बु. ता.मुखेड अंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नवीन भरती करतेवेळी कोणत्या शासन निर्णयानुसार नेमणूक करण्यात आली त्या बाबतचा शासन निर्णय मिळणे, |
| ६५ | १०.०६.२०२४ | मौ.जांब ता.मुखेड जि.नांदेड येथील निती निकेतन शिक्षण संस्थेतंर्गत मौ.जांब बु. येथील शैक्षणिक संकुल बाबतच्या बांधकामाबाबतचे आपल्या कार्यालयाकडुन दिलेल्या बांधकाम परवानगी, बांधकाम परवानगी मिळणेबाबतचे संस्थेने दाखल |

| | | |
|---|---|---|
| | | केलेले सर्व दस्ताऐवज, संस्थेच्या बांधकामाचे अंदाजपत्रक (निधी) मिळणेबाबत, |
| ६६ | १३.०९.२०२३ | निती निकेतन शिक्षण संस्थेच्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठताची माहिती मिळणेबाबत, |
| ६७ | ०२.११.२०२३ | मा.दिवाणी न्यायाधिश साहेब मुखेड यांच्या हुकुमनाम्यानुसार फेरफारची नोंद घेणेबाबत, |
| ६८ | ३०.११.२०२३ | दि.२८.१२.२०२१ रोजी निती निकेतन विद्यार्थी वसतिगृह जांब बु. येथील वसतिगृहात जाऊन स्थळ पंचनाम्याची माहिती मिळणेबाबत, |
| ६९ | १५.१२.२०२३ | मौ.जांब बु, ता.मुखेड येथील निती निकेतन विद्यार्थी वसतिगृह येथे दि.२८.१२.२०२१ रोजी वसतिगृहाचे दस्ताऐवज दयानंद माधवराव पाटील तलाठी सजा जांब बु., हे हजर राहुन शासकीय दस्ताऐवज नष्ट केलेल्या रोजी आपल्या कार्यालयाकडुन रिलीव्ह झाल्याबाबतची माहिती मिळणे, |
| ७० | २३.०२.२०२४ | पोलीस स्टेशन कार्यालय मुखेड अंतर्गत स्थानिक अर्ज दि.०१.०१.२०२२ ते दि.२२.०२.२०२४ पर्यंतची माहिती मिळणेबाबत, |
| ७१ | २३.०२.२०२४ | पोलीस स्टेशन कार्यालय मुखेड अंतर्गत जांब बु. दुरक्षेत्र येथील दि.०१.०१.२०२३ ते दि.२२.०२.२०२४ पर्यंतचे मोमेन्ट रजिस्टरची सत्यप्रत मिळणेबाबत, |
| ७२ | २८.०८.२०२३ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी पं., नांदेड व तहसिलदार (सा), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या पत्रावरील आपल्या कार्यालयाकडुन केलेला संपूर्ण अहवाल मिळणेबाबत, |
| ७३ | २१.०८.२०२३ | मौ.जांब बु. येथील गट नं.४६० मधील जमिनीतील प्लॉट ग्रा.पं. मालमत्ता क्र.११८५ व ११८६ रद्द करणेबाबत गट विकास अधिकारी पं.स., मुखेड यांनी दि.०३.०८.२०२३ रोजी जा.क्र.२५११/२०२१ पंसमु/पंचायत-१ तसेच दि.१४.०८.२०२३ रोजी जा.क्र.१६५५/पंसमु/पंचायत-१ च्या पत्रान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळणेबाबत, |
| ७४ | २१.०८.२०२३ | आपल्या कार्यालयाकडे मी दि.०३.०६.२०२२ रोजी दिलेल्या पत्रावरुन आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल सत्यप्रतीत मिळणेबाबत, |
| ७५ | १३.०७.२०२३ | अपर जिल्हाधिकारी नांदेड यांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळणेबाबत, |
| ७६ | ११.१२.२०२३ | राज्य माहिती आयुक्त खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३.१०.२०२३ जा.क्र.११६८५ च्या आदेशावर आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या संपूर्ण संचिकेचा अहवाल, |
| ७७ | ३०.११.२०२३ | दि.२८.१२.२०२१ रोजी निती निकेतन विद्यार्थी वसतिगृह जांब बु. येथील वसतिगृहात जाऊन स्थळ पंचनाम्याची माहिती मिळणेबाबत, |
| ७८ | १०.०४.२०२४ | मौ.जांब बु., ता.मुखेड येथील दि.०१.१०.२०२२ ते दि.१०.०४.२०२४ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाची मासिक सभा, ग्रामसभेचे प्रोसेडिंग बुक, नोटीस, सदस्यांच्या व नागरिकाच्या हजेरी रजिस्टरची झेरॉक्स, नमुना नं.८ ला खतवण्यात आलेल्या रजिस्टरची व कशाच्या आधारे नमुना ८ अ ला नोंद घेण्यात आली याची माहिती, |
| १०३ | १५.१२.२०२३ | मौ.जांब बु.मुखेड येथील निती निकेतन विद्यार्थी वसतिगृह येथे दि.२८.१२.२०२१ रोजी वसतिगृहाचे दस्ताऐवज श्री.एन.एन.गिते ग्रामविकास अधिकारी हे हजर राहुन शासकीय दस्ताऐवज नष्ट केलेल्या रोजी आपल्या कार्यालयाकडुन रिलीव्ह झाल्याबाबतची माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी असंबंधित पत्रव्यवहार करुन माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. सदर सर्व माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली असल्यामुळे वस्तुस्थितीची शहानिशा करण्याकरिता माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती मोघम स्वरुपाची आहे. तसेच काही माहिती ही तक्रार अर्जावर काय कार्यवाही झाली याबाबतची आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी करताना

कार्यालयीन अभिलेखातील विशिष्ट नेमक्या कागदपत्राची मागणी करण्याऐवजी संनिग्ध स्वरुपाच्या माहितीची मागणी केलेली आहे. मात्र अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. तसेच अपिलार्थी यांनी ज्या स्वरुपातील माहितीची मागणी केलेली आहे त्या स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपातील माहितीचे अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशा माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही, असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त १९ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10230 दिनांक : 22.08.2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ७९८, ७९९, ८००, ८०८, ८०९, ८०१, ६३१५ व ४५७५/२०२४ (०८)

श्री.संजय बाबुराव येरपुरवाड,
रा.जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.५४ ते ५९) : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक,
निती निकेतन वसतिगृह, जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड

१.२ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.६० व ६१)
कार्यालय अधीक्षक,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२५.०१.२०२४ (०६), दि.३०.०४.२०२४ (०१) व दि.१२.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये आठ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, श्री.सतिश गंगाराम गोटमुकळे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री.ए.एम.पंडित उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या आठ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५४ | ०६.११.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड जि.नांदेड येथील विद्यार्थ्यांचे वसतिगृहाचे सन २०१० पासुन ते आजतागायतचे ऑडिट रिपोर्ट, वसतिगृहाची शासनाने दिलेली मान्यता आदेशाची सत्यप्रत, कर्मचाऱ्यांच्या मूळ वैयक्तिक मान्यता सत्यप्रतीत मिळणेबाबत, |
| ५५ | २६.१०.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड येथील निती निकेतन विद्यार्थ्यांचे वसतिगृहाचे बांधकाम विभागाने केलेल्या आतापर्यंतच्या मुल्यांकन प्रमाणपत्राचे सत्यप्रत, |
| ५६ | २३.१०.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड, जि.नांदेड येथील विद्यार्थ्यांचे वसतिगृहातील सर्व कर्मचाऱ्यांची यादी व वैयक्तिक मान्यता, जातनिहाय (रोस्टर), |

| | | |
|---|---|---|
| ५७ | २३.१०.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड जि.नांदेड येथील निती नि. विद्यार्थ्यांचे वसतिगृहाला आपल्या कार्यालयाकडुन आजतागायत एकूण इमारत भाडे किती दिले याबाबतची बँक पासबुकासह व संस्थेच्या ठरावासह माहिती, |
| ५८ | २३.१०.२०२३ | मौ.जांब ता.मुखेड जि.नांदेड येथील नि.नि.वि. वसतिगृहाच्या इमारत भाडे मिळणेबाबतच्या संस्थेकडुन दाखल केलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत, |
| ५९ | २३.१०.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड जि.नांदेड येथील निती निकेतन विद्यार्थ्यांचे वसतिगृहाची इमारत संस्थेची आहे अथवा मालकाची आहे मालकाच्या नावासह माहिती, |
| ६० | १८.१२.२०२३ | मौ.जांब बु. ता.मुखेड येथील निती निकेतन विद्यार्थी वसतिगृह येथे दि.२८.१२.२०२१ रोजी वसतिगृहाचे दस्ताऐवज नष्ट करण्यासाठी संस्थेने आपल्याकडे मागितलेली परवानगी प्रस्ताव व आपल्या कार्यालयाचे आदेशाची / परवानगी पत्राबाबत माहिती, |
| ६१ | २६.०२.२०२४ | आपल्या कार्यालयाकडे दि.२३.१०.२०२३ व दि.०६.११.२०२३ रोजीच्या तक्रारीनुसार आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. बोर्ड क्र.५४ ते ५९ मधील माहितीचे अर्ज जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सादर केलेले आहेत. सदरची माहिती समाज कल्याण विभागाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र समाज कल्याण विभागाने अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याऐवजी सहाही माहितीचे अर्ज निती निकेतन वसतिगृहाकडे हस्तांतरित केलेले आहेत. यापूर्वी निती निकेतन वसतिगृहाकडे माहितीचे अर्ज सादर करुन माहिती मागितली असता त्यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. तसेच समाज कल्याण विभागाकडुन त्यांचेकडे वर्ग केलेल्या अर्जाच्या अनुषंगानेही त्यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. म्हणून हवी असलेली माहिती समाज कल्याण विभागाकडुन मागितलेली आहे. मात्र त्यांनी देखील माहिती देण्याचे टाळुन माहितीचे अर्ज वसतिगृहाकडे वर्ग केलेले आहेत. सदर वसतिगृहास शासनाकडुन मोठ्या प्रमाणात अनुदान मिळत आहे. मात्र सदर वसतिगृहास शासनाची मान्यता आहे किंवा कसे, वसतिगृहाची इमारत मालकीची आहे किंवा भाडे तत्वावर आहे या व अशा इतर माहितीची मागणी केली असता कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे. तसेच बोर्ड क्र.६० व ६१ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देखील मिळाली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, निती निकेतन वसतिगृह, जांब बु., ता.मुखेड, जि.नांदेड यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीचे अर्ज समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. सदरचे माहिती अर्ज जिल्हा परिषदेकडुन वसतिगृहाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. सदर माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख पावसात भिजुन खराब झालेला आहे व त्यास वाळवी लागलेली आहे ही बाब वसतिगृह व्यवस्थापनाच्या निदर्शनास आल्यानंतर पंचनामा करुन सदरचा अभिलेख नष्ट करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अशी वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. तथापि माहितीसंदर्भातील अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी करता येणे शक्य झालेले नाही.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त व्हावी, या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क)

(दोन) नुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह आठ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 10621 दिनांक : 22.08.2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. १००६४, १००६५, ७८२६, ७८२८, ७८२९/२०२२, २३८३, २३८६, ३३८८, ३३९३, ३३९४/२०२३, ५८५३/२०२४, ६८३६, २३८२, २३८७, ३३९२/२०२३, ५८५२/२०२४, २०३२, २३८८, २३८५/२०२३, ५८४६, ५८५५, ५८५९, ५८६१, ५८६०/२०२४, ६८३३, ६८३५, ६८२७ ते ६८३२, ६८३७, २३८४, ३३८६, ३३९५, ३३९६, १६७२, १६७३, ६८३४, १६७१, ३३८७, ३३९१, ३३८९, ३३९०/२०२३, ५८५६, ५८५७, ५८४५, ५८४९, ५८५०, ५८५१, ५८४७, ५८४८, ५८५४, ५८५८, ९९८/२०२४
(५६ व्दितीय अपिले)

| | |
|---|---|
| श्री.शेख शकील मो.युसुफ देळुबकर,<br>रा.देळुब, ता.अर्धापूर, जि.नांदेड | अपिलार्थी |

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी |
|---|---|---|---|
| ७९ | १००६४/२०२२ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरी, ता.अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ८० | १००६५/२०२२ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लोणी बु., ता.अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ८१, ८३ | ७८२६/२०२२,<br>७८२९/२०२२ | **जन माहिती अधिकारी,**<br>पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ८२, ८४,<br>८७, ८८ | ७८२८/२०२२,<br>२३८३/२०२३,<br>३३९३/२०२३,<br>३३९४/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दळुब बु., ता.अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ८५ | २३८६/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मालेगाव, ता.अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ८६, ८९ | ३३८८/२०२३,<br>५८५३/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** | उत्तरवादी क्र.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.२ |
| ९० | ६८३६/२०२३ | **जन माहिती अधिकारी,**<br>गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९१, ९२ | २३८३/२०२३,<br>२३८७/२०२३ | **जन माहिती अधिकारी,**<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९३ | ३३९२/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९४ | ५८५२/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मुदखेड, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९५ | २०३२/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, हदगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहजिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, व्हिआयपी रोड, पोमदे बिल्डींग, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९६ | २३८८/२०२३ | **जन माहिती अधिकारी,**<br>नगर पंचायत, नायगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>मुख्याधिकारी, नगर पंचायत, नायगाव, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९७ | २३८५/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, हदगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, हदगाव, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९८ | ५८४६/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ९९ | ५८५५/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>दुय्यम निबंधक श्रेणी-१, दुय्यम निबंधक कार्यालय क्र.०३, नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व्ही.आय.पी. रोड, पोमदे बिल्डींग, नांदेड | |
| १०० | ५८५९/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०१ | ५८६१/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०२ | ५८६०/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>उपकार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.०८, नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.०८, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०४ | ६८३३/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०५ | ६८३५/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., अर्धापूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या., तरोडा नाका, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०६ | ६८२७/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), परिक्षेत्र मुखेड, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा), वन विभाग, गांधी पुतळ्याच्या पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०७ | ६८२८/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परिक्षेत्र किनवट, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), शिवाजी चौक, किनवट, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०८, ११३ | ६८२९/२०२३, २३८४/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र हदगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा), वन विभाग, गांधी पुतळ्याच्या पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १०९ | ६८३०/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र हिमायतनगर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा), वन विभाग, गांधी पुतळ्याच्या पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११० | ६८३१/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र माहूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), शिवाजी चौक, किनवट, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १११ | ६८३२/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र देगलूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा), वन विभाग, गांधी पुतळ्याच्या पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ११२ | ६८३७/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र भोकर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>सहायक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा), वन विभाग, गांधी पुतळ्याच्या पाठीमागे, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ११४ | ३३८६/२०२३ | **जन माहिती अधिकारी,**<br>शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ११५, ११६ | ३३९५/२०२३,<br>३३९६/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चाभरा, ता.हदगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| ११७,<br>११८, ११९ | १६७२/२०२३,<br>१६७३/२०२३,<br>६८३४/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तामसा, ता.हदगाव, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२० | १६७१/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पासदगाव, ता.जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी (प), पंचायत समिती, नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२१ | ३३८७/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२२ | ३३९१/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, उत्तर नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२३ | ३३८९/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जि. नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ | ३३९०/२०२३ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, माहुर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहुर, जि. नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२५, १२६ | ५८५६/२०२४,<br>५८५७/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, देगलूर, जि.नांदेड<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर, जि. नांदेड | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२७,<br>१३०, १३२ | ५८४५/२०२४,<br>५८५१/२०२४,<br>५८४८/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,<br>जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२८ | ५८४९/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जवळा पां.,<br>ता.कळमनुरी, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,<br>जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १२९ | ५८५०/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आखाडा<br>बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,<br>जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १३१ | ५८४७/२०२४ | **जन माहिती अधिकारी,**<br>तहसिल कार्यालय, वसमत, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, वसमत, जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १३२ | ५८५४/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>कक्ष अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १३४ | ५८५८/२०२४ | **जन माहिती अधिकारी तथा**<br>उपअभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत,<br>जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |
| १३५ | ९९८/२०२४ | **जन माहिती अधिकारी,**<br>तहसिल कार्यालय, कळमनुरी, जि.हिंगोली<br>**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**<br>तहसिलदार, तहसिल कार्यालय, कळमनुरी, जि.हिंगोली | उत्तरवादी क्र.१<br><br>उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये ५६ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची

सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आलेले आहे. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच बहुतांश जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या ५६ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अ. क्र. | बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|---|
| १ | ७९ | ०१.०८.२०२२ | दि.०१.०१.२०१५ ते दि.३१.१२.२००९ व दि.०१.०३.२०२१ ते दि.३०.०७.२०२२ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतमार्फत १४ व्या व १५ व्या वित्त आयोगातुन झालेल्या संपूर्ण कामाची लेखी माहिती, |
| २ | ८० | ०५.०८.२०२२ | दि.०१.०१.२०१५ ते दि.३१.१२.२०१९ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतमार्फत १४ व्या वित्त आयोगातुन व इतर निधीमधुन झालेल्या विकास कामाची माहिती देणे तसेच ग्रामपंचायतच्या सर्व खातेची अद्ययावत आकडेवारीची माहिती, |
| ३ | ८१ | २७.०५.२०२२ | अर्धापूर तालुक्यातील सर्व गावाचे रोजगार सेवक यांनी केलेल्या सन २०१५ ते आजपर्यंतच्या कामाचे हजेरी मस्टर, बँक पासबुक व बँकेचे स्टेटमेंट सत्यप्रत, दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.०३.२०२२, |
| ४ | ८२ | ०१.०४.२०२२ | मौ.देळुब बु. ता.अर्धापूर येथील सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम चालु आहे, त्या बांधकामाचे मॉडेल, नकाशा, वर्कऑर्डर, इस्टीमेट, एम.बी. याची माहिती, |
| ५ | ८३ | ०१.०४.२०२२ | अर्धापूर तालुक्यातील सर्व गावातील ग्रामपंचायतमार्फत झालेल्या सार्वजनिक शौचालय बांधकामाचे मॉडेल, नकाशा, वर्कऑर्डर, इस्टीमेट, एमबी, दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.०३.२०२२, |
| ६ | ८४ | १४.१२.२०२२ | दि.०१.०१.२०२० पासुन दि.१३.१२.२०२२ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातुन झालेल्या सर्व कामाची वर्कऑर्डर, अंदाजपत्रक, एमबी व सदर कालावधीमध्ये पांदन रस्ते, दलितवस्तीतील कामे व तसेच पाणी पुरवठा योजनेतुन झालेल्या कामाची माहिती, |
| ७ | ८५ | १८.११.२०२२ | दि.०१.०१.२०२० पासुन ते दि.१५.११.२०२२ पर्यंत ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातुन झालेल्या सर्व कामांची वर्कऑर्डर, अंदाजपत्रक, एमबी व सदर कालावधीमध्ये पांदन रस्ते, दलितवस्तीतील कामे व तसेच पाणी पुरवठा योजनेतुन झालेल्या कामाची माहिती, |
| ८ | ८६ | २१.१२.२०२२ | अर्धापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोग निधी, दलित वस्ती सुधार योजना निधी, तांडा वस्ती सुधार योजना निधी, आमदार खासदार निधी, २५-१५ अंतर्गत कामे, अंगणवाडी बांधकाम, समाज मंदिर बांधकाम, सार्वजनिक शौचालय या कामाच्या सर्व देयकामधुन कपात झालेली टक्केवारी, जीएसटी, कामगार विमा, इन्शुरन्स कपात, तहसिल रॉयल्टी, सेस निधी याची माहिती, |
| ९ | ८७ | २७.०१.२०२३ | मौजे देळुब बु. येथील तुराबशाह वली कब्रस्तान संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यासाठी कोणत्या आधारे ई-निविदा झाली आहे, तुराबशाह अली कब्रस्तान संरक्षण भिंतीचे काम करण्यास कोणाचा विरोध आहे त्यांच्याकडुन त्या जागेच्या पुराव्यासह लेखी घेण्यात यावी तसेच तुराबशाह वली कब्रस्तानची जागा गावठाणमध्ये असताना त्याचे संरक्षण भिंतीचे बांधकाम का होत नाही याची माहिती, |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ८८ | २८.०१.२०२३ | तुराबशाह अली कब्रस्तानच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम रोखने बाबत विरोधकांनी आपल्याकडे दिलेले अर्ज व आपल्याकडे वरिष्ठांकडुन आलेले अर्ज व आपण वरिष्ठाकडे केलेले अर्ज या सर्व अर्जाची प्रत, |
| ११ | ८९ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीत पं.स. अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| १२ | ९० | २१.१२.२०२२ | अर्धापूर तालुक्यातील सर्व जि.प. प्रा. / माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी, उपस्थिती अहवाल, पगारीचा तपशिल या सर्व कागदपत्राची माहिती, |
| १३ | ९१ | ०६.१२.२०२२ | दि.०१.०१.२०२१ ते दि.०५.१२.२०२२ या कालावधीत अर्धापूर तालुक्यामध्ये सा.बां. विभागामार्फत किती कामे चालु आहे व किती झाले याची यादी, |
| १४ | ९२ | ०६.१२.२०२२ | सा.बां. विभागामार्फत मौजे मालेगाव-सावरगाव-कोंढा-देळुब खु.-भोगावच्या हद्दीपर्यंत रोड लगत एकुण किती वृक्ष लागवड करण्यात आले व किती वृक्ष जिवंत आहेत याची संपूर्ण माहिती, |
| १५ | ९३ | २७.१२.२०२२ | नांदेड आसना नदीवर नवीन पुलाचे बांधकाम झाले आहे, त्या बांधकाम झालेल्या पुलाचे वर्कऑर्डर, नकाशा, मॉडेल, मेजरमेंट, इस्टीमेट, एमबी याची माहिती, |
| १६ | ९४ | ३०.१२.२०२३ | मौजे देळुब बु. येथे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग मुदखेड अंतर्गत अंदाजे ४०० ते ५०० मिटर रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम होत आहे त्या कामाचे वर्कऑर्डर सह शेड्युल बी मधील पूर्ण कागदपत्राची माहिती, |
| १७ | ९५ | १३.१२.२०२२ | मौजे जांभळसावली ता.हदगाव, जि.नांदेड येथील गट क्र.८९ व ९० मधील कृष्णादेवी सतीश पिलंगवाड, गोपाळ मारोती बोडके व मयुरेश गोविंद बोडके यांच्या नावे आपल्या कार्यालयामध्ये झालेली रजिस्ट्रीची सत्यप्रत, |
| १८ | ९६ | १६.११.२०२२ | १.नायगाव नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुक २०२१-२२ करिता निवडणूक खर्च शासनाकडुन किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन किती प्राप्त झाले व किती खर्च झाले याबाबत माहिती, २. तसेच नगर पंचायत फंडातुन व इतर अनुदानातुन नगर पंचायत कार्यालयास निवडणुकीसाठी किती अनुदान प्राप्त झाले व किती खर्च झाले याबाबतची पूर्ण माहिती, |
| १९ | ९७ | १३.१२.२०२२ | मौजे जांभळसावली ता.हदगाव जि.नांदेड येथील गट क्र.८९ व ९० मध्ये कोणत्या कागदपत्राआधारे कृष्णादेवी सतीश पिलुंगवाड, गोपाळ मारोती बोडके व मयुरेश गोविंद बोडके यांच्या नावे सामाईक फेरफार लावण्यात आले त्या सर्व कागदपत्रांची माहिती, |
| २० | ९८ | १०.१०.२०२३ | नांदेड उत्तर व दक्षिण मध्ये गौण खनिज उत्खननासाठी ०१ जानेवारी २०२३ पासुन दि.३० सप्टेंबर २०२३ पर्यंत किती गुत्तेदारांनी किती ब्रासची तहसिल कार्यालयात रॉयल्टी भरली आहे व आपल्या तहसिल अंतर्गत किती गुत्तेदारांना किती ब्रासची उत्खनन करण्याची परवानगी दिली आहे याची माहिती, |
| २१ | ९९ | ३१.०१.२०२४ | दि.२९ व ३० जानेवारी २०२४ रोजीचे दस्त नोंदणी झालेल्या सर्व सुची क्र.२ चे सत्यप्रत देण्यात यावी, |
| २२ | १०० | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीत तहसिल अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| २३ | १०१ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीत तहसिल अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| २४ | १०२ | ०८.०२.२०२४ | अर्धापूर तालुक्यातील मौजे लहान, येळेगाव सर्कलमध्ये कालव्यामधील लाईनचे काम चालु आहे त्या कामाचे वर्कऑर्डर सहीत शेड्युल बी मधील सर्व कागदपत्राची माहिती, |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | १०४ | २३.०१.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते दि.२४.०१.२०२३ पर्यंतच्या कालावधीची लॉगबुकची व पुरविण्यात आलेल्या तांत्रिक साहित्य / यंत्र याची माहिती, |
| २६ | १०५ | १६.०३.२०२३ | अर्धापूर शहरातील वॉर्ड क्र.१२ मधील शेख खदीर महेमुदमियाँ यांचे ग्राहक क्रमांक ५५००२००२३६२७ या क्रमांकाकचे सन २०२०-२१ मध्ये विद्युत मिटर जळाले होते, त्यांनी नवीन मिटरसाठी भरलेलेल्या पैशाची पावती व दिलेले अर्ज हे दोन्ही कागदपत्र मिळणे, |
| २७ | १०६ | २२.०५.२०२३ | सन ०१ एप्रिल २०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| २८ | १०७ | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| २९ | १०८ | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| ३० | १०९ | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| ३१ | ११० | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| ३२ | १११ | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| ३३ | ११२ | २२.०५.२०२३ | दि.०१.०४.२०२१ ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये वृक्षारोपन करण्यासाठी किती निधी आपल्याकडे आला व आपण किती वृक्षारोपन केले व किती जगविले, वृक्ष रोपनासाठी आणि संगोपनासाठी किती खर्च आला याची सर्व माहिती, |
| ३४ | ११३ | १३.१२.२०२२ | हदगाव तालुक्यातील वनपरिक्षेत्र अंतर्गत जमिनीमधुन किती ब्रासची गुत्तेदारांनी आपल्या कार्यालयाकडे रॉयल्टी भरलेली आहे व आपल्या कार्यालयाकडुन किती ब्रासची गुत्तेदारांना परमिशन देण्यात आली आहे त्या सर्व कागदपत्राची माहिती, |
| ३५ | ११४ | ०७.०१.२०२३ | सन २०१६ पासुन गरोदर माता, स्तनदा सवलत म्हणून पदस्थापना बदलुन देण्यात आलेल्या शिक्षकांची यादी, सवलतीचा कालावधी, मुळ पदस्थापना, बदलुन देण्यात आलेली पदस्थापना, बदलून देण्यात आलेला दिनांक याची माहिती, |
| ३६ | ११५ | २१.१२.२०२२ | दि.०१.०१.२०२१ पासुन ते दि.२०.१२.२०२२ या वर्षामध्ये १५ व्या वित्त आयोग मधुन झालेले सी.सी.रस्ते, सी.सी.नाली, दलित वस्तीमध्ये झालेली सी.सी.रस्ते, सी.सी.नाली, पेवर ब्लॉक, समाज मंदिर, तांडा वस्तीमध्ये सी.सी.रस्ते, सी.सी.नाली, पेवर ब्लॉक, अंगणवाडी बांधकाम, सार्वजनिक शौचालय या सर्व बांधकाम झालेल्या कामाचे वर्क ऑर्डर, नकाशा, इस्टीमेट, एम.बी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | याकागदपत्राची माहिती, |
| ३७ | ११६ | २१.१२.२०२२ | दि.०१.०१.२०१५ पासुन ते दि.३१.१२.२०१९ या वर्षामध्ये १४ व्या वित्त आयोग निधी, दलित वस्ती सुधार योजना निधी, तांडा वस्ती सुधार योजना निधी, आमदार खासदार निधी, २५-१५ अंतर्गत कामे, अंगणवाडी बांधकाम, समाज मंदिर बांधकाम, सार्वजनिक शौचालय या सर्व बांधकाम झालेल्या कामाचे वर्क ऑर्डर, नकाशा, इस्टीमेट, एम.बी. या कागदपत्राची माहिती, |
| ३८ | ११७ | ०३.११.२०२२ | मौजे तामसा येथील ग्रामपंचायत अंतर्गत गट क्र.४ मध्ये एकुण भाड्याने दिलेल्या दुकानांची संख्या, सर्व दुकानदारांचे नाव, ग्रामपंचायतने त्यांच्याशी केलेला करार तसेच गटामध्ये दुकानाची बांधकाम परवानगीची सत्यप्रत, |
| ३९ | ११८ | ०३.११.२०२२ | मौजे तामसा ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्र.१ मध्ये सन २०२०-२१, २०२१-२२२, २०२२-२३ विविध योजनेतंर्गत रस्ते, गटारी, झालेल्या कामाचे वर्कऑर्डर, इस्टीमेट, एमबी. सर्व माहिती, |
| ४० | ११९ | २२.०५.२०२३ | दि.०१.०१.२०२० ते दि.२०.०५.२०२३ या कालावधीमध्ये किती ग्रामसभा घेण्यात आले ग्रामसभेतील सर्व नागरीकांचे सह्या रजिस्टरची व प्रोसेडिंग पूर्ण केलेल्या रजिस्टरच्या सर्व पानाची माहिती, |
| ४१ | १२० | १४.१२.२०२२ | दि.०१.०१.२०२० ते दि.१३.१२.२०२२ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातुन झालेल्या सर्व कामाची वर्कऑर्डर, अंदाजपत्रक, एम.बी. व सदर कालावधीमध्ये पांदन रस्ते, दलित वस्तीतील कामे व तसेच पाणी पुरवठा योजनेतुन झालेल्या कामाची माहिती, |
| ४२ | १२१ | ०७.०१.२०२३ | १४ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व १५ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीमध्ये घेण्यात आले आहे, या प्रशिक्षणाला किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला यात खर्च झालेल्या सर्व बिलासहीत माहिती व सरपंच, ग्रामसेवक उपस्थिती अहवाल याची माहिती, |
| ४३ | १२२ | ०७.०१.२०२३ | १४ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व १५ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीमध्ये घेण्यात आले आहे, या प्रशिक्षणाला किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला यात खर्च झालेल्या सर्व बिलासहीत माहिती व सरपंच, ग्रामसेवक उपस्थिती अहवाल याची माहिती, |
| ४४ | १२३ | ०७.०१.२०२३ | १४ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व १५ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीमध्ये घेण्यात आले आहे, या प्रशिक्षणाला किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला यात खर्च झालेल्या सर्व बिलासहीत माहिती व सरपंच, ग्रामसेवक उपस्थिती अहवाल याची माहिती, |
| ४५ | १२४ | ०७.०१.२०२३ | १४ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व १५ व्या वित्त आयोगातुन सरपंच, ग्रामसेवक प्रशिक्षण सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या कालावधीमध्ये घेण्यात आले आहे, या प्रशिक्षणाला किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला यात खर्च झालेल्या सर्व बिलासहीत माहिती व सरपंच, ग्रामसेवक उपस्थिती अहवाल याची माहिती, |
| ४६ | १२५ | ३०.११.२०२३ | सन २०२१-२०२२, २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ या कालावधीमध्ये १५ वित्त आयोग कृती आराखडा तयार करण्यासाठी पंचायत समिती अंतर्गत गट वाईज दोन-दोन दिवसिय कार्यशाळा घेण्यासाठी किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला तसेच ग्रामसेवक सरपंच यांच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उपस्थिती अहवालासह कार्यशाळेला झालेलया खर्चाची जीएसटी बिलासहीत पूर्ण माहिती, |
| ४७ | १२६ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीत पं.स. अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| ४८ | १२७ | २२.०८.२०२३ | १५ व्या वित्त आयोगातुन कृती आराखडा प्रशिक्षणासाठी किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झाला तसेच ग्रामसेवक-सरपंच उपस्थित अहवाल व जीएसटी बिलासहीत माहिती, |
| ४९ | १२८ | २१.०९.२०२३ | जवळा पांचाळ ग्रा.पं. ला खासदार/आमदार व जि.प.सदस्य यांचा किती निधी गावाच्या विकास कामासाठी आला व ग्रा.पं.कडुन किती निधी खर्च झाला या माहितीसह दि.०१ जानेवारी २०१७ पासुन ते २० सप्टेंबर २०२३ पर्यंत या कालावधीत १५ व्या वित्त आयोग सर्व कॅशबुक, पासबुक, एमबी, अंदाजपत्रक, व्हावचर, ठराव, प्रोसेडिंग, ग्रामसभा, मासिक सभा, डीपीडीसी अंतर्गत रेकॉर्ड, २५-१५ रेकॉर्ड, दलित वस्ती रेकॉर्ड व नमुना नं.७-१० पावती, फेरफार संचिकासह सर्व खात्याची माहिती, |
| ५० | १२९ | २१.०९.२०२३ | आखाडा बाळापूर ग्रा.पं.ला खासदार/आमदार व जि.प.सदस्य यांचा किती निधी गावाच्या विकास कामासाठी आला व ग्रा.पं.कडुन किती निधी खर्च झाला या माहितीसह दि.०१.०१.२०१७ पासुन दि.२०.०९.२०२३ पर्यंत या कालावधीत १५ व्या वित्त आयोग सर्व कॅशबुक, पासबुक, एमबी, अंदाजपत्रक, व्हावचर, ठराव, प्रोसेडिंग, ग्रामसभा, मासिक सभा, डीपीडीसी अंतर्गत रेकॉर्ड, २५-१५ रेकॉर्ड, दलित वस्ती रेकॉर्ड व नमुना नं.७-१० पावती, फेरफार संचिकासह सर्व खात्याची माहिती, १३० |
| ५१ | १३० | २१.०९.२०२३ | दि.०१.०१.२०१७ पासुन ते दि.२१.०९.२०२३ पर्यंत या कालावधीत कळमनुरी पंचायत समिती कार्यालयामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा दिनांक व प्रतिनियुक्ती दिनांक, प्रतिनियुक्तीचा पदस्थापना दिनांक, सदर कर्मचाऱ्यांना कोणकोणत्या विभागाचे पदभार देण्यात आलेले आहेत त्यांच्या नावासहीत सर्व माहिती, |
| ५२ | १३१ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीतील तहसिल अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| ५३ | १३२ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीतील तहसिल अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| ५४ | १३३ | ३०.११.२०२३ | सन २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीतील तहसिल अंतर्गत शासनाच्या हर घर झेंडा योजनेचा प्राप्त झालेला एकुण निधी केलेल्या खर्चाच्या प्रमाणकाची माहिती, |
| ५५ | १३४ | ०७.०२.२०२४ | अर्धापूर तालुक्यातील मालेगाव सर्कल मधील कॅनल व सबकॅनलवर मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे तथा करण्यात येत नाही याची माहिती, |
| ५६ | १३५ | ०९.०८.२०२३ | कळमनुरी तालुक्यात दि.०१.०१.२०२१ ते दि.१०.०८.२०२३ या कालावधीमध्ये आपल्या कार्यालयात किती गुत्तेदारांनी रॉयल्टी भरलेली आहे व आपल्यामार्फत किती गुत्तेदारांना किती ब्रासची परवानगी देण्यात आलेली आहे याची सर्व माहिती, तसेच दि.०१.०१.२०२१ ते दि.१०.०८.२०२३ या कालावधीत कळमनुरी तालुक्यामध्ये अवैध रित्या गौण खनिज उत्खनन करते वेळेस आपल्या पथकामार्फत पकडण्यात आलेले हायवा, टिप्पर, जेसीबी यावर आपल्यामार्फत किती दंड आकारण्यात आलेले आहे व सदर प्रकरणात आपल्या मार्फत किती गुत्तेदारांवर कार्यवाही करण्यात आलेली आहे याची सर्व माहिती, |

२. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे सर्व जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

३. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना मोठ्या प्रमाणावर सादर केलेल्या माहिती व प्रथम अपील अर्ज आणि त्या संदर्भात आयोगाकडे तेवढीच व्दितीय अपिले दाखल करण्यामागील भुमिकेची विचारणा केली असता त्यांनी असे अवगत केले की, ते स्वत: सामाजिक कार्यकर्ता असुन माहिती अधिकारात मागितलेली माहिती माहिती मिळत नाही, माहिती अधिकाराचा धाक राहिलेला नाही, शासकीय कामात मोठ्या प्रमाणावर अनियमिता व भ्रष्टाचार होत असल्यामुळे माहितीची मागणी केलेली आहे. मात्र कोणत्याही कार्यालयाकडुन माहिती मिळालेली नाही.

४. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी एक सारखीच माहिती त्या त्या कार्यालयाकडे मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी विस्तृत व व्यापक स्वरुपाची आणि एका पेक्षा अधिक विषयाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. माहिती अधिकाराचे कामकाज हे कालमर्यादित स्वरुपाचे असुन माहिती व प्रथम अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत दैनंदिन कामकाज सांभाळून अपिलार्थी यांच्या माहिती व प्रथम अपिलावर कार्यवाही करण्याकरिता तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही. अलीकडच्या काळात विनाकारण त्रास देण्याच्या उद्देशाने अर्ज करणाऱ्यांची संख्या वाढत आहे त्यामुळे कायद्याची प्रतिमा मलिन होत असुन सोबतच नागरी हक्कांसाठी लढणाऱ्या लोकांना देखील टीकेला सामोरे जावे लागत आहे. माहिती अधिकार अधिनियमात जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची तरतुद आहे. त्याचप्रमाणे कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांवर देखील अंकुश ठेवण्यासाठी बंधन घालणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांच्या आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीतील व्दितीय अपिलांच्या संख्येवरुन अपिलार्थी यांचा माहितीची मागणी करण्याचा उद्देश निश्चितच जनहिताशी संबंधित आहे, असे वाटत नाही.

५. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

६. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध प्राधिकरणांकडे ५६ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील तक्त्यामध्ये नमूद अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्याकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपिलार्थी यांचे नाव | आयोगाकडे दाखल व्दितीय अपिलांची संख्या | आयोगासमोरील सुनावणी / निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री.केशवराजे निंबाळकर | २७८८ | दि.२६.०६.२०२४ |
| २. | श्री.केशवराजे निंबाळकर | ८४२ | दि.१९.१२.२०२४ |
| ३. | श्री.शरद दाभाडे | १५९ | २६.०४.२०२४ |
| ४. | श्री.शरद दाभाडे | ९८५ | दि.२७.०९.२०२४ |
| ५. | श्री.मोतीराम गयबु काळे | ४६३ | दि.२३.०९.२०२४ |
| ६. | श्री.बाळासाहेब भास्कर बनसोडे | २५६ | दि.२०.१२.२०२४ |
| ७. | श्रीमती अनिता नितीन वानखेडे | ११६ | दि.०६.०९.२०२४ |
| ८. | श्री.बाबुराव धोंडु चव्हाण | १९८ | दि.२०.०१.२०२५ |
| ९. | श्री.जयभीम नरसिंगराव सोनकांबळे | १७६ | दि.०१.१०.२०२४ |
| १० | श्री.हरि प्रताप गिरी | २९६ | दि.२८.०८.२०२४ |
| ११ | श्री.विनोदकुमार भारुका | २३६ | दि.२८.०८.२०२४ |
| १२ | श्री.गिरीश म.यादव | २०६ | दि.२३.०८.२०२४ |
| १३ | श्री.संजय हाबु राठोड | १०० | दि.३०.०८.२०२४ |
| १४ | श्री.रायभान किसन उघडे | २१६ | दि.३०.०९.२०२४ |
| १५ | श्री.बालाजी बळीराम बंडे | १५६ | दि.०१.१०.२०२४ |
| १६ | श्री.भालचंद्र साळुंके | १०३ | दि.२४.०१.२०२५ |
| १७ | श्री.मिलिंद दगडु मकासरे | १२५ | दि.३०.०८.२०२४ |
| १८ | श्री.ज्ञानेश्वर धायगुडे | ८६ | दि.२४.०१.२०२५ |
| १९ | श्री.सुरज नंदकिशोर व्यास | ६३ | दि.२४.०१.२०२५ |
| २० | श्री.जनक रामराव गायकवाड | ८१ | दि.०४.०७.२०२५ |

७. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

८. मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील 6454/2011, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

९. मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.20182, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१०. मा.उच्च न्यायालय, दिल्ली येथील रिट पिटीशन क्र.०४०६/२०१६, निर्णय दि.१९.०१.२०१६ मध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

"As held by Hon'ble Mr.Justice Manmohan in W.P.(C) 406/2016 of Delhi High Court in case of Shail Sahni Vs Smt. Valsa Sara Mathew & Ors., 19 th January, 2016"

Keeping in view the width and amplitude of the information saught by the petitioner, it is apparent that the RTI application of the appellant is nothing short of an abuse of process of law and motivated if not an attempt to intimidate the respondent..

Indiscriminate and impractical demands or direction under RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counter productive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down the non-productive work of collecting and furnishing information.

११. तसेच अपिलार्थी यांचे माहिती अर्ज व अर्जाची संख्या विचारात घेता, मा.उच्च न्यायालय कर्नाटक, खंडपीठ धारवाड यांनी नुकताच रिट पिटीशन क्र.101260/2024 (GM-RES) मध्ये दि.२५.०९.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये संबंधित याचिकाकर्ताची याचिका फेटाळत खालीलप्रमाणे पारित केलेले आदेश या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटत आहे.

"The Present case is classic example of how indiscriminate use of the RTI Act can adversely affect public administration. The petitioner actions, if allowed to continue, would not only waste valuable public resources but would also delay the processing of genuine RTI applications filed by citizens seeking information in good faith.

Upone considering the fact and circumstances of this case, along with the relevant judicial procedents, this court is of the opinion that **the petitioners has clearlu misused the provisions of the RTI Act. The petitioners conduct in filling thousands of RTI application**

across multiple department, without any legitimate reason or cause, constitutes an abuse of the process of law. The petitioner request to withdraw the Writ petition without paying the requisite court fees is not acceptable, as it would set a dangerous precedent and encourage further misuse of the RTI Act.

The registry is directed to take necessary steps to **recover the deficit court fee of Rs.9,64,600/- from the pitioner** in accordance with law. The petitioner shall be liable to pay the entire deficit amount as per the objection raised by the office of this court."

१२. केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/2012/000858-SA ते 000872-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari**

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.246/IC(A)2006, F No.CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 Auguest 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

**IN Shri Gopal Soni V The New India Assurance Company Ltd.**

(F.No.CIC/AT/A/2008/00097, 000116, 000124, dated 12.06.2008) learned Commissioner Shri A.N. Tiwari dealt with similar problem. The respondents in the case submitted that the appellant, their employee, was suspended for insubordination and misconduct, and ever since be directed a spate of application containing queries for detailed, voluminous but inane information which would have to be collected and collated from over 30 branches. The Commission held in this case "**answering the elaborate and detailed queries, which have to be both accurate and authentic, imposes heavy cost on the public authority and tends to divert its recourses, which brings it within the scope of section 7 (9) of RTI Act**"

१३. तसेच तत्कालीन केंद्रीय माहिती आयुक्त, मा.श्री.शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/ 000926/SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17 th January, 2012) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."

१४. तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

१५. प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत

असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. अपिलार्थी यांची सर्व ५६ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

२. **जिल्हाधिकारी, नांदेड, हिंगोली / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, हिंगोली / मुख्य वनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर** यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची **जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा नांदेड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर** यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 11296 दि. 11/9/2025

प्रत :- माहिती तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित,
जिल्हाधिकारी, नांदेड, हिंगोली
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, हिंगोली
मुख्य वनसंरक्षक, वन विभाग, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक २५९३, २५९४ व २५९५/२०२५ (०३)**

श्री.कैलास सांडु घट्टे,
सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना (आंतरवर्ग प्रशिक्षण विभाग), झाशी राणी पुतळ्या समोर, जे.ई.एस. कॉलेज रोड, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा क्रीडा अधिकारी,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर, औसा रोड, लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, जिल्हा क्रीडा संकुल, औसा रोड, लातूर

(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, श्री.महादेव आबा कसगावडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १३६ | ०४.११.२०२४ | १. आयोजक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूरकडुन आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२४-२०२५ ची माहिती पुस्तिका ची प्रत व दिनांक २६.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ रोजी पावेतो पार पाडलेल्या राज्यस्तरीय शालेय योगासन स्पर्धेचे संदर्भात स्पर्धेच्या नियमावलीची साक्षांकित प्रत व इतर २७ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |
| १३७ | ०४.११.२०२४ | २. लातूर येथे दिनांक २६.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ रोजी पावेतो झालेल्या राज्य स्तरीय शालेय योगासन स्पर्धेतील आर्टीस्टीक योगासन १४ वर्षे आतील मुली या क्रीडा स्पर्धेचे दि.२८.१०.२०२४ रोजीचे व्हीडीओ चित्रकरण (पेनड्राईव्ह मध्ये) व इतर ०२ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १३८ | ०४.११.२०२४ | १. दि.२६.१०.२०२४ ते दि.२८.१०.२०२४ रोजी दरम्यान लातूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत तक्रार निवारण करण्यासाठी गठीत केलेली तक्रार निवारण समितीमधील किती सदस्य प्रत्यक्ष स्पर्धेचे ठिकाणी हजर होते किंवा नव्हते त्याबाबतची माहिती प्रत, कर्तव्यावर हजर असलेबाबत दाखला, हजेरीपटाची साक्षांकित प्रत व इतर ०९ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे तीन माहितीचे अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. पण सदर दिलेली माहिती दिशाभूल करणारी व मोघम आहे. तसेच उर्वरित माहितीसंदर्भात माहिती उपलब्ध आहे किंवा कसे, निरंक आहे इ. अशी वस्तुस्थिती स्पष्टपणे कळविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्यामुळे ज्या बाबीकरिता माहिती मागितलेली आहे त्या बाबीची शहानिशा करता येणे शक्य होत नाही किंवा त्या बाबीकरिता सक्षम ठिकाणी दाद मागता येणे देखील शक्य होत नाही. म्हणून माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, सद्यस्थितीत जन माहिती अधिकारी या पदाचा नियमित पदभार असुन प्रथम अपिलीय अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु जी माहिती कार्यालयात उपलब्धच नाही ती माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन जेवढी माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे तेवढी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. वास्तविक अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा अधिक शब्दांव्दारे केलेली आहे. असे जरी असले तरी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती मिळावी हाच स्वच्छ हेतु ठेऊन माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती असद्‌ हेतुने दडविलेली नाही. या परिस्थितीत आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट, दिशाभूल व मोघम स्वरुपात माहिती देण्यात आलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मिळालेली माहिती दिशाभूल करणारी व मोघम असल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना

कळविण्यात यावे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, विभागीय क्रीडा संकूल, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11293 दिनांक :- 10/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर विभाग, विभागीय क्रीडा संकूल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर.

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५९६, २५९७ व २५९८/२०२५ (०३)**

श्रीमती वैशाली कैलास घट्टे, — अपिलार्थी
व्दारा-श्री.कैलास सांडु घट्टे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना (आंतरवर्ग प्रशिक्षण विभाग), झाशी राणी पुतळ्या समोर, जे.ई.एस. कॉलेज रोड, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा क्रीडा अधिकारी,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर, औसा रोड, लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, जिल्हा क्रीडा संकुल, औसा रोड, लातूर

**(सुनावणी दिनांक १३.०८.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, श्री.महादेव आबा कसगावडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १३९ | ०४.११.२०२४ | १. लातूर येथे दिनाक २६.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ रोजी पावेतो झालेल्या राज्य स्तरीय शालेय योगासन स्पर्धेतील आर्टीस्टीक योगासन १४ वर्षे आतील मुली या क्रीडा स्पर्धेचे दि.२८.१०.२०२४ रोजीचे व्हीडीओ चित्रकरण (पेनड्राईव्ह मध्ये) व इतर ०२ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |
| १४० | ०४.११.२०२४ | १. दि.२६.१०.२०२४ ते दि.२८.१०.२०२४ रोजी दरम्यान लातूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत तक्रार निवारण करण्यासाठी गठीत केलेली तक्रार निवारण समितीमधील किती सदस्य प्रत्यक्ष स्पर्धेचे ठिकाणी हजर होते किंवा नव्हते त्याबाबतची माहिती प्रत, कर्तव्यावर हजर असलेबाबत दाखला, हजेरीपटाची साक्षांकित प्रत व इतर ०९ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १४१ | ०४.११.२०२४ | १. आयोजक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूरकडुन आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२४-२०२५ ची माहिती पुस्तिका ची प्रत व दिनांक २६.१०.२०२४ ते २८.१०.२०२४ रोजी पावेतो पार पाडलेल्या राज्यस्तरीय शालेय योगासन स्पर्धेचे संदर्भात स्पर्धेच्या नियमावलीची साक्षांकित प्रत व इतर २७ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांचेकडे तीन माहितीचे अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. पण सदर दिलेली माहिती दिशाभूल करणारी व मोघम आहे. तसेच उर्वरित माहितीसंदर्भात माहिती उपलब्ध आहे किंवा कसे, निरंक आहे इ. अशी वस्तुस्थिती स्पष्टपणे कळविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्यामुळे ज्या बाबीकरिता माहिती मागितलेली आहे त्या बाबीची शहानिशा करता येणे शक्य होत नाही किंवा त्या बाबीकरिता सक्षम ठिकाणी दाद मागता येणे देखील शक्य होत नाही. म्हणून माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, सद्यस्थितीत जन माहिती अधिकारी या पदाचा नियमित पदभार असुन प्रथम अपिलीय अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु जी माहिती कार्यालयात उपलब्धच नाही ती माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन जेवढी माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे तेवढी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. वास्तविक अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा अधिक शब्दाव्दारे केलेली आहे. असे जरी असले तरी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती मिळावी हाच स्वच्छ हेतु ठेऊन माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती असद्‌हेतुने दडविलेली नाही. या परिस्थितीत आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट, दिशाभूल व मोघम स्वरुपात माहिती देण्यात आलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मिळालेली माहिती दिशाभूल करणारी व मोघम असल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना

कळविण्यात यावे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, विभागीय क्रीडा संकूल, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 11292 दिनांक : 10/9/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर विभाग, विभागीय क्रीडा संकूल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते